सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २४९ | सोमवार, दि. १ जुन २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com







अमळनेर : येथील शेतकी संघाच्या पंचवार्षिक निवडणुकीत विजयी झालेल्या सहकार पॅनलच्या उमेदवारांसमवेत आमदार अनिलदादा पाटील. दुसऱ्या छायाचित्रात विजयी महिला उमेदवारांसमवेत नगरसेविका सौ. जयश्रीताई पाटील. शेवटच्या छायाचित्रात गुलाल उधळून विजयाचा जल्लोष साजरा करताना गणेश भामरे. (सर्व छायाचित्रे : रजनीकांत पाटील)

> शेतकी संघाच्या निवडणुकीबाबत सांगायचे म्हणजे खरेतर या संस्थेची निवडणूक बिनविरोधच व्हायला हवी होती. परंतु काहींनी जागा वाटपावेळी अट्टाहास धरल्याने नाईलाज झाला. आज जरी १५ पैकी १० जागा सहकार पॅनलला मिळालेल्या दिसत असल्या, तरी निकालाचे अवलोकन केले असता व्यक्तिशः मतदारसंघात राष्ट्रवादीचा पॅनल टू पॅनलचा एव्हरेज २२०० पेक्षा अधिक आहे. मात्र, बाद मतांचा फटका बसल्याने आमच्या किमान दोन जागा कमी झाल्या. यावरून मतदारांनी राष्ट्रवादी काँग्रेसवरच विश्वास दाखविला हे स्पष्ट झाले आहे. यापुढेही शेतकी संघाच्या उन्नती, प्रगती व शेतकऱ्यांच्या हितासाठी आम्ही सर्वांना सोबत घेऊन कार्यरत राहू.
>
> –अनिलदादा पाटील, आमदार

# अमळनेर शेतकी संघावर 'सहकार'ची सत्ता; १० जागा मिळवून दणदणीत विजय

## आमदार अनिलदादा पाटील यांच्या नेतृत्वावर शेतकऱ्यांकडून विश्वास व्यक्त

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**अमळनेर :** येथील अमळनेर तालुका शेतकरी सहकारी संघाच्या पंचवार्षिक (सन २०२५–२०३०) निवडणुकीत आमदार अनिलदादा पाटील यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा गटाच्या सहकार पॅनेलने दमदार विजय मिळवत १० जागांवर विजय मिळवत निर्विवाद बहुमत संपादन केले. काँग्रेसला ३ जागांवर समाधान मानावे लागले, तर भाजप समर्थित पॅनेलला केवळ २ जागा मिळाल्या.

व्यक्तिशः मतदारसंघात एकूण ७,९२५ मतदान झाले. त्यापैकी ८७३ मते बाद ठरली. किसान काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष प्रा. सुभाष पाटील (३,४५३), सुरेश पिरण पाटील (२,८२८) व प्रा. श्याम पवार (२,२८६) विजयी झाले. राष्ट्रवादी काँग्रेस गटातून संभाजी पाटील (२,९२५) व संजय पुनाजी पाटील (२,७५२) यांनी विजय मिळवला. राष्ट्रवादीचे अनिल शिसोदे यांना पराभवाचा धक्का बसला.महिला मतदारसंघात ७,४२६ मतदान झाले असून ६०५ मते अवैध ठरली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुषमा वासुदेव देसले (३,२५४) व मालुबाई बापूराव पाटील (२,७८६) विजयी झाल्या. काँग्रेसच्या दोन्ही महिला उमेदवारांना पराभव स्वीकारावा लागला.

सोसायटी मतदारसंघात १०६ मतदान झाले. राष्ट्रवादी काँग्रेसचे नितीन पाटील (७१), गणेश भामरे (६९) व सचिन पाटील (५३) विजयी झाले. भाजपचे जितेंद्र पाटील (५३) यांनीही विजय मिळवला. प्रफुल पवार व महेश देशमुख यांना प्रत्येकी ५२ मते मिळाल्याने ईश्वर चिठ्ठीद्वारे निर्णय घेण्यात आला, त्यात प्रफुल पवार विजयी ठरले.ओबीसी मतदारसंघातून विक्रांत पाटील (२,५५४) विजयी झाले, तर भाजपचे डॉ. अनिल शिंदे यांचा पराभव झाला. एससी/एसटी मतदारसंघातून शंकर बंडू बैसाणे (२,६४४) विजयी झाले. एनटी प्रवर्गातून रणजित भीमसिंग पाटील (२,६४२) यांनी विजय मिळवला.

या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसने सर्वच स्तरांवर आघाडी घेत शेतकी संघावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले.

काल सकाळपासून इंदिरा भुवन येथे मतमोजणी प्रक्रिया पार पडली.सुरवातीला व्यक्तिशः मतदारसंघाची मोजणी झाली यात राष्ट्रवादी २ व काँग्रेस ३ जागांवर विजयी झाले.या मतदारसंघात भाजपाला एकही खाते उघडता आले नाही.त्यानंतर महिला मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही महिला विजयी झाल्या येथेही भाजपाला अपयश आले.त्यानंतर सोसायटी मतदारसंघात पाच पैकी ३ जागांवर राष्ट्रवादीचे उमेदवार विजयी झाले.तर भाजपाचा एका जागेवर विजय झाला.पाचव्या जागेसाठी दोन उमेदवारांना समान मते पडल्याने ईश्वर चिट्ठी काढण्यात आली यात भाजपचे प्रफुल पाटील विजयी झाले.यानंतर ओबीसी,एस सी एस टी आणि एन टी या तिन्ही जागांवर राष्ट्रवादीने विजय मिळविला येथेही भाजपाला पुर्णतः अपयश आले.निकाल जाहीर होताच राष्ट्रवादी काँग्रेस कार्यकर्त्यांनी मतदान केंद्राबाहेर आमदार अनिलदादा पाटील यांचा जयघोष करत गुलालाची उधळण करून जल्लोष साजरा केला.

**पॅनल टू पॅनल मध्येही राष्ट्रवादी आघाडीवर**

सदर निवडणुकीत तीन पॅनल रिंगणात होते,व्यक्तिशःच्या मतमोजणीत पॅनल टू पॅनलचा एव्हरेज लक्षात घेता राष्ट्रवादीला २२०० च्या आसपास पॅनल टू पॅनल मते मिळाली. काँग्रेसला साधारणपणे १५०० च्या आसपास पॅनल टू पॅनल मते मिळाली तर भाजपला एक हजारच्या आसपास पॅनल टू पॅनल मते मिळाली.तर बाद मतांची संख्याही राष्ट्रवादीची जास्त होती,अनेकांनी पॅनलच्या ५ उमेदवारासोबत सहावे मतदानही केल्याने ती मतपत्रिका बाद झाली. याचा फटका राष्ट्रवादीच्या उमेदवारांना

पान २ वर

> निवडणुकीसाठी किसान पॅनलच्या माध्यमातून आम्ही कार्यकर्त्यांची टीम उभी केली होती. त्यांनी निवडणुकीत यश प्राप्त व्हावे यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले. तरीही शेतकऱ्यांनी निवडणूक निकालातून जो कौल दिलेला आहे तो आम्हाला मान्य आहे. यापुढेही शेतकऱ्यांची सेवा सुरूच राहील.
>
> –स्मिताताई पाटील, खासदार

> मी कायम शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी लढत असतो. आज जे काही यश मिळाले, ते शेतकऱ्यांचेच आहे. शेतकऱ्यांसाठीचा लढा यापुढेही सुरूच राहील. शेतकरी हा देशाचा कणा असल्याने त्याच्या सन्मानासाठी कायम प्रयत्न असतील. निवडणुकीत शेतकऱ्यांनी टाकलेला विश्वास आमच्या कामाची पावती आहे.
>
> –प्रा.सुभाष पाटील, अध्यक्ष–किसान सेल (काँग्रेस)



शेतकरी संघ निवडणुकीतील सोसायटी मतदारसंघाच्या मतमोजणीत प्रफुल्ल पवार व महेश देशमुख या उमेदवारांना समसमान ५३ मते मिळाली. त्यामुळे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या सूचनेने बालकाच्या हातून ईश्वरचिठ्ठी काढण्यात आली. त्यात प्रफुल्ल पवार यांचे नाव निघाल्याने त्यांना विजयी घोषित करण्यात आले.

**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१

**सोने-चांदी**
**आजचे भाव**

| | |
|---|---|
| २४ Ct सोने ९९.५०% | ₹ १५१५०० |
| २२ Ct सोने ९१.६०% | ₹ १४०१०० |
| १८ Ct सोने ७५.००% | ₹ ११६५०० |
| शुद्ध चांदी ९९९% | ₹ २६००/- |

भाव प्रती १० ग्राम

गर्व से कहो स्वदेशी है हम...!
स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा–जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा–तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...! जय स्वदेशी...!!

## दिनविशेष

१ जून

- विष्णुपंत गोविंद दामले, शेख फत्तेलाल, व्ही. शांताराम आणि केशवराव धायबर यांनी कोल्हापुरात प्रभात फिल्म कंपनीची स्थापना केली.
- दख्खनची राणी डेक्कन क्वीन ट्रेन मुंबई–पुणे दरम्यान सुरू झाली.
- टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्चची स्थापना.
- द. जा. कर्वे हे पुणे विद्यापीठाचे तिसरे कुलगुरू झाले.
- भारताचे ११ वे पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांनी सूत्रे हाती घेतली.
- रमेशचंद्र लाहोटी यांनी भारताचे ३५ वे सरन्यायाधीश म्हणून पदभार स्वीकारला.






## संपादकीय

# लवकरच राज्यसभेचे चित्र पालटणार..!

विधानसभा निवडणुकांचे महत्त्व वाढत आहे. राज्यसभेतील ताकद वाढवायची असेल तर केवळ लोकसभा निवडणुका जकून चालत नाही. राज्यांमध्ये मजबूत संघटन, प्रभावी नेतृत्व आणि सत्तेवर पकड असणे आवश्यक असते.लोकसभेत स्पष्ट बहुमत असलेल्या सरकारला राज्यसभेतील संख्याबळाच्या मर्यादांमुळे अनेकदा धोरणात्मक अडचणींचा सामना करावा लागतो. म्हणूनच राज्यसभा निवडणुका सत्तासंतुलनाचा निर्देशांक मानल्या जातात. जूनमध्ये दहा राज्यांमधील २४ राज्यसभा जागांसाठी होणाऱ्या निवडणुकांनंतर राज्यसभेचे राजकीय चित्र बदलणार असून सत्ताधारी, इंडिया' आघाडी आणि प्रादेशिक पक्षांच्या भूमिकेवर परिणाम दिसून येणार आहे. चार राज्ये आणि एका केंद्रशासित प्रदेशात झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीनंतर पुढच्या महिन्यात राज्यसभेच्या २४ जागांसाठी तसेच एका जागेवरील पोटनिवडणुकीसाठी मतदान होत आहे. महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी राज्यसभेच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. त्यांच्या रिक्त जागेवर निवडणूक होत आहे. ही जागा राष्ट्रवादीच्या कोट्यातील आहे. त्यामुळे पवार जो उमेदवार देतील, तो निवडून येईल. महायुतीकडे २३० हून अधिक आमदार असल्याने कदाचित निवडणूक बिनविरोध होईल. वास्तविक, २४ जागांची निवडणूक फार मोठी वाटत नाही. राज्यसभेची एकूण सदस्यसंख्या २४५ असून त्यापैकी बहुसंख्य जागांवर आधीच सदस्य कार्यरत आहेत, तरीदेखील या निवडणुकांचे महत्त्व कमी होत नाही. कारण राज्यसभा हे कायमस्वरूपी सभागृह असले, तरी त्याची राजकीय रचना दर दोन वर्षांनी हळूहळू बदलत असते. प्रत्येक निवडणूक भविष्यातील सत्तासंतुलनाला आकार देत असते. या वेळीही तसेच घडण्याची शक्यता आहे. उपलब्ध विधानसभा गणिताचा विचार केला तर आंध्र प्रदेश, गुजरात, मध्य प्रदेश, अरुणाचल प्रदेश, मणिपूर आणि काही ईशान्येकडील राज्यांमध्ये सत्ताधारी एनडीए कवा त्यांचे मित्रपक्ष स्पष्टपणे मजबूत स्थितीत आहेत. दुसरीकडे, कर्नाटक, झारखंड आणि काही प्रमाणात राजस्थानमध्ये विरोधी पक्षांना काही जागा मिळण्याची संधी आहे; मात्र एकूण परिणामांचा विचार करता या निवडणुकांमधून 'एनडीए'चे संख्याबळ वाढण्याची शक्यता अधिक आहे. विशेषतः आंध्र प्रदेशमधील बदल अत्यंत महत्त्वाचा ठरू शकतो.

गेल्या विधानसभा निवडणुकीत आंध्र प्रदेशमध्ये तेलुगू देसम पक्ष, भारतीय जनता पक्ष आणि जनसेना पक्षाच्या आघाडीने प्रचंड विजय मिळवला. त्याचा थेट परिणाम राज्यसभा निवडणुकीत दिसणार आहे. चारही जागा 'एनडीए'च्या खात्यात जाण्याची शक्यता आहे. यातील काही जागा पूर्वी वायएसआर काँग्रेसकडे होत्या. त्यामुळे राज्यसभेत 'वायएसआर' काँग्रेसचा प्रभाव कमी होणार असून 'एनडीए'ची ताकद वाढणार आहे. दक्षिण भारतातील राजकीय समीकरणांच्या दृष्टीने हा बदल महत्त्वाचा आहे. गुजरातमध्येही भाजपचे वर्चस्व कायम आहे. त्या राज्यातही चारही जागा भाजपच्या झोळीत जाण्याची शक्यता असल्याने विरोधकांचे अस्तित्व आणखी कमी होईल. एके काळी काँग्रेसचा मजबूत प्रभाव असलेल्या या राज्यात आज राज्यसभा प्रतिनिधित्वातही भाजपची जवळपास एकाधिकारशाही दिसू लागली आहे. यामुळे राष्ट्रीय स्तरावर भाजपचे विधिमंडळातील स्थान अधिक मजबूत होणार आहे. मध्य प्रदेशमध्ये परिस्थिति याहून वेगळी नाही. विधानसभा निवडणुकीतील दणदणीत विजयामुळे भाजपकडे राज्यसभेच्या तीनही जागा जकण्यासाठी आवश्यक संख्याबळ आहे. परिणामी, काँग्रेसची एक जागा कमी होण्याची शक्यता आहे. दिग्विजय सह यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्याची मुदत संपल्यानंतर काँग्रेसला ती जागा टिकवून ठेवता आली नाही, तर ते पक्षासाठी राजकीय आणि मानसिक दोन्ही स्तरांवर नुकसानकारक ठरेल. कर्नाटक हे या निवडणुकीतील सर्वाधिक लक्षवेधी राज्य ठरू शकते. येथे काँग्रेसच्या नेतृत्वाखालील सरकार सत्तेत असल्यामुळे तीन जागा 'इंडिया' आघाडीच्या खात्यात आणि एक जागा 'एनडीए'कडे जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे विरोधकांना काही प्रमाणात दिलासा मिळेल;असे असले तरी, राज्यसभेतील एकूण चित्र बदलण्यासाठी हे याश पुरेसे ठरणार नाही. कारण इतर अनेक राज्यांमधील नुकसान त्यावर मात करू शकणार नाही. झारखंडमध्ये इंडिया आघाडीला दोन्ही जागा मिळण्याची शक्यता आहे.

यामुळे विरोधकांची उपस्थिती कायम राहील; परंतु राष्ट्रीय स्तरावर त्याचा प्रभाव मर्यादित असेल. राजस्थानमध्ये दोन जागा भाजपकडे तर एक जागा काँग्रेसकडे जाण्याची शक्यता असल्याने विद्यमान संतुलनात फारसा फरक पडणार नाही. या निवडणुकांनंतर राज्यसभेतील संख्यात्मक स्थितीकडे पाहिले, तर 'एनडीए'ची ताकद काही जागांनी वाढण्याची चिन्हे आहेत. या वाढीमुळे त्यांना तात्काळ स्पष्ट बहुमत मिळणार नसले, तरी विधेयके मंजूर करताना आणि संसदीय रणनीती आखताना त्यांना अधिक सोयीची परिस्थिती निर्माण होईल. विशेषतः भाजपला मित्रपक्षांच्या मदतीने सभागृहात अधिक आत्मविश्वासाने काम करता येईल. लोकसभा निवडणुकीत २०२४ मध्ये भाजपला एकहाती बहुमत मिळाले नाही आणि एनडीए सरकारला मित्रपक्षांच्या आधारावर सत्तेत यावे लागले. त्यामुळे अनेक विश्लेषकांनी केंद्र सरकारच्या निर्णयक्षमतेबाबत प्रश्न उपस्थित केले होते; मात्र राज्यसभेतील वाढते संख्याबळ या आघाडी सरकारसाठी महत्त्वाचे सुरक्षा कवच ठरू शकते. अनेक महत्त्वाच्या विधेयकांना राज्यसभेची मंजुरी आवश्यक असते. अशा वेळी सभागृहात मजबूत उपस्थिती असणे हे कोणत्याही सरकारसाठी मोठे राजकीय बळ असते. दुसरीकडे विरोधी 'इंडिया' आघाडीसमोर नवीन आव्हान उभे राहणार आहे. लोकसभा निवडणुकीत तुलनेने चांगली कामगिरी करूनही राज्यसभेतील संख्या वाढवण्यात त्यांना फारसे यश मिळताना दिसत नाही. याचे मुख्य कारण म्हणजे अनेक राज्यांमधील विधानसभा निवडणुकांमधील त्यांची कमकुवत स्थिती. राज्यसभा सदस्यांची निवड ही विधानसभेतील संख्याबळावर आधारित असल्यामुळे सत्ता नसलेल्या कवा पुरेसे आमदार नसलेल्या राज्यांमध्ये जागा मिळवणे जवळपास अशक्य असते. या निवडणुकांमधून आणखी एक महत्त्वाचा संदेश मिळतो.

# छत्रपती शिवरायांचा मोडी लिपीतील इतिहास उलगडणार!



## राज्य सरकारकडून नेमण्यात आले ३० मोडी लिपीतील तज्ज्ञ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महाराष्ट्र तसेच देशभरात मोडी लिपीतील ८० कोटींहून अधिक कागदपत्रे आहेत. या कागदपत्रांत छत्रपती शिवाजी महाराज, पेशवेकालीन तसेच यादव कालीन इतिहास दडलेला आहे. मात्र पुरेसे मोडी लिपी तज्ज्ञ नसल्याने हा इतिहास या कागदपत्रांतच बंदिस्त आहे. हा – इतिहास उलगडण्यासाठी राज्य सरकारने विशेष मोहीम हाती घेतली आहे. यासाठी ३० मोडी लिपी अभ्यासकांची नियुक्ती करण्यात आली असून ऐतिहासिक मोडी लिपीतील कागदपत्रांचे अचूक मराठी लिप्यंतर तसेच इंग्रजी भाषांतर करणार असून या मोडी अभ्यासकांची यादीच सरकारने जाहीर केली आहे.

**सिंहगडावरचा भव्यदिव्य राजवाडा कोणी विकला?**

सिंहगडावर शिवाजी महाराजांच्या काळातील भव्य राजवाडा, रत्नशाळा आणि जवाहिरखाना होते. पण ब्रिटिशांनी १८७६ मध्ये त्यांची जाहिरात करून लिलावात विकून टाकले. सह्याद्रीच्या कुशीत विसावलेला ऐतिहासिक सिंहगड आपण अनेकदा पाहतो. त्याचे बुलंद बुरुज आणि नभाला भिडणारी तटबंदी आपल्याला थक्क करते. पण आज आपल्याला दिसणारा सिंहगड हा मूळ सिंहगडाचा केवळ एक छोटासा भाग आहे, हे फार कमी लोकांना माहिती आहे. एकेकाळी या विस्तीर्ण गडावर केवळ लष्करी चौक्या नव्हत्या, तर डोळे दीपवून टाकणाऱ्या अनेक भव्य आणि देखण्या इमारती दिमाखात उभ्या होत्या. काळाच्या अथांग प्रवाहात आज या वास्तू कुठे गायब झाल्या आणि त्यांचा साधा मागमूसही गडावर का उरला नाही हा इतिहासप्रेमींना सतावणारा एक मोठा प्रश्न आहे.

**शिवशाहीतील सुवर्णकाळ आणि भव्य वास्तू**

या किल्ल्याचे खरे वैभव फुलले ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या सुवर्णकाळात. महाराजांनी गडाचे सामरिक महत्त्व ओळखून येथे अनेक नवीन आणि भक्कम बांधकामे करून घेतली. त्या काळात गडाची शान वाढविणारा एक भव्य राजवाडा येथे दिमाखात उभा होता. एवढेच नव्हे; तर मौल्यवान रत्नांनी आणि दागिन्यांनी ओसंडून वाहणारा जवाहिरखाना आणि सुबक कलाकुसर असलेली रत्नशाळा या गडावर अस्तित्वात होत्या. शिवकाळानंतर पेशवाईतही या वास्तू गडाचे वैभव वाढवत होत्या. मात्र, आज गडावर फिरताना या ऐतिहासिक वास्तूंचे कोणतेही अवशेष नजरेस पडत नाहीत.

**सत्तेचे हस्तांतरण आणि पडद्यामागील कट**

सिंहगडाच्या इतिहासाला सगळ्यात मोठी कलाटणी मिळाली ती सन १८१८ मध्ये. मराठेशाहीचा अस्त झाल्यानंतर हा अजिंक्य किल्ला इंग्रजांच्या ताब्यात गेला. सिंहगड ताब्यात आल्यानंतर ब्रिटिशांनी गडावर अनेक अंतर्गत बदल करण्यास सुरुवात केली. गडावरील मराठ्यांच्या पराक्रमाच्या आणि वैभवाच्या खुणा पुसून टाकण्याचा एक छुपा अजेंडा यात होता. याच कुटिल धोरणाचा भाग म्हणून गडावरील त्या ऐतिहासिक आणि भव्य इमारती जशाच्या तशा ठेवण्याऐवजी त्या नष्ट करण्याचा किंवा त्यांची विल्हेवाट लावण्याचा एक मोठा आणि धक्कादायक निर्णय तत्कालीन प्रशासनाने घेतला.

**वृत्तपत्रातील जुनी जाहिरात आणि खरेदीदार**

इतिहासाच्या पानात दडलेले हे रहस्य एका जुन्या पुराव्यामुळे जगासमोर आले आहे. २ मे १८७६ च्या 'द पूना ऑब्झर्व्हर' या तत्कालीन प्रसिद्ध वृत्तपत्रात एक अत्यंत धक्कादायक जाहिरात प्रसिद्ध झाली होती. या जाहिरातीवरून स्पष्ट होते, की इंग्रजांनीच सिंहगडावरील या वैभवशाली इमारती आणि राजवाडा चक्क विकून टाकला होता. एका ऐतिहासिक किल्ल्याच्या वैभवाचा इंग्रजांनी बाजार मांडला होता. या लिलावात दोराबजी पदमजी नावाच्या एका श्रीमंत व्यक्तीने त्या सर्व ऐतिहासिक इमारती विकत घेतल्याचे समोर आले असून त्या इमारती पुढे भाड्याने देण्याची तयारीही त्या जाहिरातीत दर्शविली होती. या खळबळजनक माहितीमुळे सिंहगडाच्या विस्मृतीत गेलेल्या इतिहासावर आता एक नवा आणि उजेड टाकणारा प्रकाश पडला आहे. इंग्रजांच्या व्यापारी वृत्तीमुळे आणि स्वार्थामुळे आपल्या एका पराक्रमी गडाचे वैभव कसे गेले याचे सत्य या निमित्ताने समोर आले आहे. आज जरी गडावर त्या रत्नशाळा आणि राजवाड्याचे अवशेष उरले नसले तरी या नव्या शोधामुळे सिंहगडाच्या भव्यतेची एक वेगळीच बाजू आजच्या पिढीला पाहायला मिळत आहे. हा शोध आपल्याला आपल्या ऐतिहासिक वारशाचे रक्षण करण्याची मोठी शिकवण देतो.

# अमळनेरात पाईपलाईनची दुरुस्ती की नावालाच मलमपट्टी?

## पाणीपुरवठा पुन्हा विस्कळीत

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जळोद–गांधली मुख्य पाणीपुरवठा पाईपलाईन अचानक फुटल्याने शहराचा पाणीपुरवठा पुन्हा एकदा विस्कळीत झाला आहे. नगर परिषद प्रशासनाने दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरू असल्याचे सांगितले असले तरी गेल्या काही महिन्यात अनेकदा अशी घटना घडल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत आधीच पाण्याच्या समस्येने त्रस्त असलेल्या नागरिकांना पुन्हा एकदा पाणीटंचाईचा सामना करावा लागणार असल्याने प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

विशेष म्हणजे, काही दिवसांपूर्वीच मुख्याधिकारी गणेश शिंदे यांनी पाणी चोरणाऱ्या विरोधात गुन्हे दाखल करून कठोर कारवाईचा इशारा दिला होता. मात्र शहरातील अनेक भागांमध्ये अजूनही अनधिकृत नळजोडण्या, बेकायदेशीर कनेक्शन आणि पाणीचोरीचे प्रकार सुरू असल्याची चर्चा आहे. अशा प्रकारांमुळे पाईपलाईनवर अतिरिक्त ताण येत असून वारंवार गळती आणि पाईप फुटण्याच्या घटना घडत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. त्यामुळे कारवाई केवळ काही मोजक्या लोकांपुरतीच मर्यादित राहिली का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

दरम्यान, पाणीपुरवठा विभागातील काही भ्रष्ट आणि बेजबाबदार घटकांवर अंकुश ठेवण्यात प्रशासन अपयशी ठरत असल्याची टीकाही होत आहे. जर पाणीचोरी रोखण्यासाठी आणि अनधिकृत जोडण्या बंद करण्यासाठी प्रभावी यंत्रणा कार्यरत असेल, तर वारंवार पाईपलाईन फुटण्याचे प्रकार का घडत आहेत? शहरातील हजारो नागरिकांना वेठीस धरणाऱ्या या समस्येची जबाबदारी नेमकी कोणाची, असा संतप्त सवाल आता नागरिकांकडून विचारला जात असून दोषींवर कठोर कारवाईची मागणी जोर धरू लागली आहे.

## शेतकी संघ निवडणुकीत विजयी झालेले उमेदवार



| | | | | |
|---|---|---|---|---|
| श्री. गणेश भामरे (राष्ट्रवादी काँग्रेस) सहकार पॅनल | श्री. संभाजी पाटील (राष्ट्रवादी काँग्रेस) सहकार पॅनल | श्री. संजय पु. पाटील (राष्ट्रवादी काँग्रेस) सहकार पॅनल | सौ. सुषमा देसले (राष्ट्रवादी काँग्रेस) सहकार पॅनल | सौ. मालूबाई पाटील (राष्ट्रवादी काँग्रेस) सहकार पॅनल |



| | | | | |
|---|---|---|---|---|
| श्री. रणजीत पाटील (राष्ट्रवादी काँग्रेस) सहकार पॅनल | श्री.नितीन पाटील (राष्ट्रवादी काँग्रेस) सहकार पॅनल | श्री. सचिन पाटील (राष्ट्रवादी काँग्रेस) सहकार पॅनल | श्री. विक्रांत पाटील (राष्ट्रवादी काँग्रेस) सहकार पॅनल | श्री. शंकर बैसाणे (राष्ट्रवादी काँग्रेस) सहकार पॅनल |



| | | | | |
|---|---|---|---|---|
| श्री. प्रा. सुभाष पाटील (काँग्रेस) शेतकरी पॅनल | श्री. प्रा. श्याम पवार (काँग्रेस) शेतकरी पॅनल | श्री. सुरेश पी. पाटील (काँग्रेस) शेतकरी पॅनल | श्री. जितेंद्र पाटील (भाजप) किसान विकास पॅनल | श्री. प्रफुल्ल पवार (भाजप) किसान विकास पॅनल |

# अमळनेर शेतकी संघावर 'सहकार'ची सत्ता; १० जागा मिळवून दणदणीत विजय

**पान १ वरून**

बसला अन्यथा व्यक्तिशः मतदारसंघात राष्ट्रवादीच्या अजून दोन जागा वाढू शकल्या असत्या.

**संपुर्ण निकाल पुढीलप्रमाणे**

**व्यक्तिशः** मतदार संघात ७९२५ मतदान झाले होते. त्यात ८७३ मते बाद झाली. किसान काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष प्रा सुभाष पाटील (३४५३),सुरेश पिरन पाटील (२८२८), प्रा श्याम पवार(२२८६), तर राष्ट्रवादी काँग्रेस गटात संभाजी पाटील (२९२५), संजय पुनाजी पाटील (२७५२) हे निवडून आलेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे अनिल शिसोदे यांचा थोड्या मतांनी पराभव झाला.

**महिला मतदारसंघ**–महिला मतदार संघात ७ हजार ४२६ मतदान झाले , ६०५ अवैध ठरले. राष्ट्रवादी काँग्रेसचे सुषमा वासुदेव देसले (३२५४), मालुबाई बापूराव पाटील (२७८६) हे विजयी झाले.भाजप एक व काँग्रेसच्या दोन्ही महिलांचा पराभव झाला.

**सोसायटी मतदारसंघ**–सोसायटी मतदार संघात १०६ मतदान झाले त्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे नितीन पाटील (७१), गणेश भामरे(६९) , सचिन पाटील(५३) , तर भाजपचे जितेंद्र पाटील (५३) विजयी झाले. प्रफुल पवार आणि महेश देशमुख यांना समान ५२ मते पडल्याने ईश्वर चिठी काढण्यात आली. त्यात प्रफुल पवार विजयी झाले.

**ओबीसी मतदारसंघ**–ओबीसी मतदार संघात राष्ट्रवादीचे विक्रांत पाटील विजयी झाले.त्यांनी भाजपचे डॉ अनिल शिंदे व काँग्रेसचे दिनेश पवार यांचा पराभव केला.

**एस.सी./एस.टी. मतदारसंघ**–एस. सी. एस. टी. मतदार संघात राष्ट्रवादीचे शंकर बंडू बैसाणे विजयी झाले.त्यांनी भाजपचे ॲड. एस. एस. ब्रह्मे यांचा पराभव केला.

**व्हीजेएनटी मतदारसंघ**–एन. टी. प्रवर्गातून राष्ट्रवादीचे रणजित भीमसिंग पाटील विजयी झाले.त्यांनी काँग्रेसचे बन्सीलाल भागवत व भाजपाचे किरण गोसावी यांचा पराभव केला.

# नंदगाव शिवारात ब्युटेरिक ॲसिडचे ३५ ड्रम फेकले

## कारवाईच्या भीतीने एक्सपायर माल फेकल्याची शक्यता

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील नंदगाव शिवारात कालबाह्य झालेल्या ब्युटीरीक ॲसिड चे ३५ ड्रम अज्ञात व्यक्तींनी खदाणीत फेकून दिल्याची घटना ३१ रोजी सकाळी उघडकीस आली. इस्टमन कंपनीच्या नावाचे सुमारे ३५ ब्युटीरीक ॲसिडचे ड्रम फेकल्याने उग्र वास पसरला होता. पोलीस पाटील यांनी पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांना कळवल्यांनतर त्यांनी पोलीस उपनिरीक्षक शरद काकळीज , पोलीस उपनिरीक्षक कविता ठाणगे, हेडकॉन्स्टेबल संदेश पाटील, गणेश पाटील यांना सोबत घेऊन भेट दिली असता कोणीतरी अज्ञात व्यक्तींनी ३५ ड्रम फेकून दिल्याचे दिसून आले. ॲसिडच्या तीव्रतेने आजूबाजूचे गवत जळालेले दिसून आले. ज्यांनी हे ड्रम फेकलेले होते त्यांच्या पायातील बूट आणि ग्लोव्हज देखील त्याच ठिकाणी फेकलेले दिसून आले. इस्टमन ब्युटेरिक कंपनी किंगस्पोर्ट येथील विदेशी कंपनी आहे. तिचे उत्पादन २०२३ साली झालेले असून ते २०२५ मध्ये एक्सपायर झाले आहे. ब्युटीरीक ॲसिड हे शरीराला ऊर्जा देण्याचे काम करते. बेकरी व खाद्य पदार्थांमध्ये त्याचा उपयोग होतो. त्याचा वास उग्र व कुबट आहे. ब्युटेरिक ॲसिड लोणी चीज बनवण्यासाठी वापरतात. प्राण्यांचे आजार टाळण्यासाठी त्यांच्या खाद्य पदार्थात वापरतात. तसेच फळ व पिकांच्या वाढीसाठी वापरतात.



> *अन्न व औषध प्रशासनाचा कारभार तुकाराम मुंढे यांनी हातात घेताच भेसळ करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करणे सुरू झाले आहे. त्या भीतीतूनच चीज ,लोणी, कोल्ड्रिंक्स किंवा पशु खाद्य मोठ्या प्रमाणात बनवणाऱ्यापैकी हे फेकण्यात आले असावे अशी शक्यता वर्तवली जात आहे.एकाचवेळी ३५ ड्रम फेकण्यासाठी मोठ्या वाहनाचा वापर झालेला असावा. त्यामुळे लवकरच त्यांचा शोध घेऊन कारण मीमांसा केली जाईल.*
>
> **– दत्तात्रय निकम** , पोलीस निरीक्षक ,अमळनेर पोलीस स्टेशन

# म.वा.मंडळात पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर जयंती साजरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथिल मराठी वाङ्मय मंडळात राजमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची ३०१ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी बन्सीलाल भागवत,डॉ एन डी ओसवाल,डॉ.सुरेश माहेश्वरी, प्रा.डॉ विजय तुंटे यांच्या हस्ते माल्यार्पण करण्यात आले. या प्रसंगी मा.गोविंद पाटील, हेमंत बाळापुरे,जगदीश कुलकर्णी आदी उपस्थित होते. राजमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी केलेल्या कार्याची महती यावेळी देण्यात आली.



**अमळनेर : राजमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जयंती निमित्त अभिवादन करताना बन्सीलाल भागवत,डॉ एन डी ओसवाल,डॉ.सुरेश माहेश्वरी, प्रा.डॉ विजय तुंटे.**

शांत – चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम
सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :– आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई–मेल : globalmahatej@gmail.com



# आजचे अभीष्टचिंतन

दै. ग्लोबल महातेज
सोमवार, दि. ०१ जून २०२६ / ३

संकल्प असावेत नवे तुमचे...
मिळाव्यात त्यांना नव्या दिशा...
प्रत्येक स्वप्न पूर्ण व्हावे तुमचे
याच दै. 'ग्लोबल महातेज' परिवारातर्फे
**वाढदिवसाच्या शुभेच्छा...!**

**श्री. दंगलदास सोनवणे** — विश्वस्त : मंगळग्रह सेवा संस्था

**श्री. विनोदभैया पाटील** — उद्योगपती

**श्री. नागराज माळी** — सारजाई क्लासेस्

**सौ. रत्नाताई भदाणे** — निवृत्त शिक्षिका

**मुख्तार खाटीक** — माजी नगरसेवक

**श्री. भटू पाटील** — टाकरखेडा

**श्री. विजय ठाकरे** — प्रताप महाविद्यालय, अमळनेर

**श्री. दयाराम पाटील** — शिक्षक / पत्रकार

**श्री. जितेंद्र वाणी** — शिक्षक / पक्षी मित्र

**श्री. ईश्वरलाल अग्रवाल** — अमळनेर

**श्री. आर. एल. माळी** — अमळनेर

**श्री. विवेक अहिरराव** — पत्रकार

**श्री. ईश्वर महाजन** — पत्रकार / शिक्षक

**ॲड. सुरेश सोनवणे** — अमळनेर

**श्री. साखरलाल माळी** — शिक्षक

**श्री. अशोक पाटील** — अध्यक्ष, मराठा सेवा संघ, अमळनेर

**प्रा. एस. ओ. माळी** — निवृत्त उपप्राचार्य, अमळनेर

**मोहम्मद करमपूरवाला** — माजी अध्यक्ष, लायन्स क्लब, अमळनेर

**श्री. अरविंद सोनटक्के** — साहित्यिक / निवृत्त शिक्षक

**श्री. एच. टी. माळी साहेब** — निवृत्त प्रांताधिकारी

**श्री. मनोहर पाटील** — तालुकाध्यक्ष : रा. कॉ. किसान सभा

**श्री. कैलास सोनार** — पेंटर

**श्री. विजय सोनार** — ज्वेलर्स

**श्री. हरचंद्र चौधरी** — अमळनेर

**श्री. वसंतराव जिभाऊ पाटील** — पत्रकार

**श्री. महेंद्र पाटील** — फोटोग्राफर / पत्रकार

**श्री. तुळशिराम हटकर** — मंडप डेकोरेटर्स

**श्री. डी. एच. ठाकूर** — निवृत्त मुख्याध्यापक

**श्री. विलासराव पवार** — शिवसेना पदाधिकारी

**सौ. सुरेखाबाई मांडगे** — अमळनेर

**श्री. प्रकाश पाटील** — मुख्याध्यापक, मंगरूळ हायस्कूल

**श्री. मनोहर पाटील** — शिक्षक

**श्री. ललितभाई मिस्तरी** — इंटेरिअर डेकोरेटर्स

**श्री. गोकूळ बागूल** — साहित्यिक

**श्री. विजय चौधरी** — भारतीय सैन्य दल

**श्री. अरुण महाजन** — अमळनेर

**श्री. संजय ढमाळ** — निवृत्त अधिकारी

**श्री. यदवीर पाटील** — पत्रकार

**श्री. सुरेश पाटील** — शिवसेना उपजिल्हा प्रमुख

**सौ. सुनंदाताई पाटील** — शिरूड, ता. अमळनेर

**श्री. चंद्रशेखर भावसार** — शिवसेना तालुकाप्रमुख

**श्री. रामचंद्र सपकाळे** — निवृत्त शिक्षक

**श्री. जयवंतराव आबा पाटील** — अध्यक्ष, मराठा समाज

**प्रा. डॉ. विजय तुंटे** — अमळनेर

**श्री. रमण भदाणे** — अमळनेर

**श्री. यशवंत बैसाणे** — आरपीआय, अमळनेर

**श्री. आर. टी. पाटील** — अमळनेर

**श्री. पदम्‌सिंग पाटील** — सेवेकरी, श्री मंगळग्रह मंदिर

**सौ. आशाताई चौधरी** — अमळनेर

**श्री. सुभाष पाटील** — निवृत्त अधिकारी, अमळनेर आगार

**प्रा. डॉ. एल. ए. पाटील** — निवृत्त प्राचार्य

**श्री. राजेश बोरसे** — अमळनेर

**श्री. श्रावण तेले** — निवृत्त शिक्षक

**श्री. नागो पाटील** — महसूल विभाग

**श्री. कांतीलाल काटे** — अमळनेर

**श्री. महेंद्र पाटील (काका)** — बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स

**श्री. विलास चौधरी** — ज्येष्ठ स्वयंसेवक

**श्री. हरिश्चंद्र पाटील** — अमळनेर

**श्री. गणेश बिऱ्हाडे** — अमळनेर

**श्री. कपिल महाले** — अमळनेर

**श्री. अनिल मराठे** — अमळनेर

**श्री. अनिल सोनवणे** — पत्रकार

**श्री. रवींद्र नेरकर** — सुरक्षा कर्मचारी, श्री मंगळग्रह मंदिर







# चंद्राला अर्घ्य देण्याचे महत्त्व आणि पूजा विधी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**


अधिक मासातील (पुरुषोत्तम मासातील) पौर्णिमेला चंद्राला अर्घ्य देण्याला हिंदू धर्मात विशेष आध्यात्मिक आणि धार्मिक महत्त्व आहे. या दिवशी चंद्राची पूजा करून त्याला जल (अर्घ्य) अर्पण करण्यामागे काही महत्त्वाची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

**१) मानसिक शांती आणि चंद्र दोषातून मुक्ती**

ज्योतिषशास्त्रात चंद्राला 'मनाचा कारक' मानले गेले आहे. अधिक मास हा भगवान विष्णूंचा (पुरुषोत्तम) महिना असल्यामुळे या काळात केलेली साधना अधिक फलदायी ठरते. अधिक मास पौर्णिमेला चंद्राला अर्घ्य दिल्याने कुंडलीतील चंद्र दोष दूर होतो आणि मानसिक तणाव, नैराश्य कमी होऊन मन शांत व प्रसन्न राहते.

**२) भगवान विष्णू आणि लक्ष्मी माता यांची कृपा**

पौर्णिमा ही तिथी लक्ष्मी मातेला अत्यंत प्रिय आहे आणि अधिक मास हा भगवान विष्णूंना समर्पित आहे. चंद्र हा देवी लक्ष्मींचा भाऊ मानला जातो. त्यामुळे या दिवशी चंद्राला अर्घ्य दिल्याने भगवान विष्णू आणि माता



लक्ष्मी दोघेही प्रसन्न होतात. ज्यामुळे घरात सुख, समृद्धी आणि ऐश्वर्य नांदते.

**३) शरीराला शीतलता मिळून आरोग्य सुधारते**

पौर्णिमेच्या रात्री चंद्र आपल्या पूर्ण कलांनी युक्त असतो. अधिक मासातील पौर्णिमेच्या रात्री चंद्राकडून निघणाऱ्या किरणांमध्ये विशेष सकारात्मक ऊर्जा आणि औषधी गुणधर्म असतात. चंद्राला अर्घ्य देताना जेव्हा पाण्याचे थेंब चंद्राच्या प्रकाशातून आपल्या शरीरावर पडतात तेव्हा शरीराला शीतलता मिळते आणि आरोग्य सुधारते.

**४) पुण्यप्राप्ती आणि पितृ दोष निवारण**

अधिक मासात केलेले दान, पुण्य आणि पूजा यांचे फळ इतर महिन्यांपेक्षा १० पटींनी अधिक मिळते, असे मानले जाते. या दिवशी चंद्राला अर्घ्य दिल्याने पूर्वजांना (पितरांना) शांती मिळते आणि जीवनातील अडचणी दूर होतात.

**अर्घ्य कसे द्यावे?**

– तांब्याच्या किंवा चांदीच्या पात्रात स्वच्छ पाणी घ्या. त्यात थोडे दूध, अक्षता, पांढरी फुले आणि चंदन घाला. रात्री चंद्र उगवल्यानंतर चंद्राकडे पाहत 'ॐ सों सोमाय नमः' किंवा 'ॐ चंद्रमसे नमः' या मंत्राचा जप करत जल अर्पण करावे.

# भगवान विष्णूंना कोणती फुले प्रिय ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अधिक मास म्हटले, की प्रत्येकच स्त्रीमध्ये एकप्रकारे उत्साह जागतो आणि महिनाभर वेगवेगळ्या प्रकारची रोज ३३ फुले वाहून ती आपल्या बाळकृष्णाची मनोभावे पूजा करते.

कृष्ण हा भगवान विष्णूंचा आठवा अवतार. जेव्हा भगवान विष्णूंना विचारले गेले, की तुम्हाला जाई, मोगरा, गुलाब, चंपा, पारिजातक अशी कोणती फुले पाहिजेत? तेव्हा भगवान विष्णूंनी सांगितले, की मला यातील कोणतेही फूल नको, मला आठ फुले पाहिजेत. ती आठ फुले कोणती याचे सुंदर वर्णन या संस्कृतच्या श्लोकामध्ये आपल्याला पाहावयास मिळते.

**अयुसा प्रथमं पुष्पं**
**पुष्पं इंद्रियनिग्रहं**
**सर्वभूत दयापुष्पं**
**क्षमापुष्पं विशेषतः**
**ध्यानपुष्पं दानपुष्पं**
**योगपुष्पं तथैवच**
**सत्यं अष्टोदम पुष्पं**
**विष्णू प्रसीदं करेत!**

अर्थात–

अयुसा हे पहिले पुष्प आहे. म्हणजेच जाणूनबुजून किंवा अजाणतेपणी कोणत्याही प्रकारे हिंसा करू नका. दुसरे पुष्प आहे इंद्रियनिग्रह. आपल्या इंद्रियांवर ताबा ठेवा. मला हे पाहिजे, माझ्याकडे ते नाही, असे म्हणू नका. समाधानी राहा. तिसरे पुष्प आहे सर्वभूत दया. सर्वांवर प्रेम करा. कोणाचाही तिरस्कार करू नका. चौथे आणि विशेष पुष्प आहे क्षमा. कोणी आपल्याला चुकीचा म्हणत असेल तरीही त्याला क्षमा करा. ध्यान पाचवे पुष्प आहे. ध्यान करा. ज्यामुळे मन एकाग्र होऊन मनावर ताबा मिळविता येईल. दान सहावे पुष्प आहे. सढळ हाताने दान करा. सातवे पुष्प आहे योग. योग करा. सर्वांत महत्त्वाचे आठवे पुष्प आहे सत्य . नेहमी सत्य बोला. सत्य बोलून एखाद्या वेळी कोणाचे मन दुखले तरी चालेल. पण असत्य बोलून एखाद्याच्या मनातून कायमचे उतरू नका. ही पुष्पे अर्पण करून भगवान विष्णूंना प्रसन्न करा.







# गुरू गोचर कर्क राशीत; 'या' ४ राशींसाठी जून ठरणार टर्निंग पॉईंट

## २ जून ते ३१ ऑक्टोबर २०२६ दरम्यान करिअर व आर्थिक बाबतीत मिळणार लाभ!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

गुरू गोचर कर्क राशीत २ जूनला होईल. गुरू आपल्या उच्च राशी कर्कमध्ये गोचर करत असल्याने हंस राजयोग तयार होईल. हंस राजयोग व्यक्तीला लाभ व प्रगती देतो. हा योग पंच महापुरुष राजयोगांपैकी एक आहे. यावेळी काही राशींना भाग्याची देखील संपूर्ण साथ मिळेल. गुरू २ जूनपासून ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत कर्क राशीत राहील. अशा स्थितीत ग्रहांच्या संयोगामुळे काही राशींना चांगला लाभ होणार आहे. या राशींना करिअर, आर्थिक तसेच प्रवासातून फायदा आणि भाग्याचा संपूर्ण पाठिंबा मिळेल. जाणून घेऊया गुरू गोचराचा कोणत्याही राशींना फायदा होईल.

गुरू २ जूनला कर्क राशीत प्रवेश करेल. या गोचरमुळे पंच महापुरुष राजयोगांमधील एक हंस राजयोग निर्माण होईल. प्रत्यक्षात जेव्हा गुरू आपल्या उच्च राशीमध्ये गोचर करतो तेव्हा हंस राजयोग तयार होतो. ज्योतिष राकेश झा



सांगतात, की हंस राजयोग अत्यंत शक्तिशाली राजयोग आहेत. गुरू २ जूनपासून ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत कर्क राशीत राहतील आणि नंतर सिंह राशीत प्रवेश करणार आहेत. या दरम्यान, १५ जुलैला गुरू कर्क राशीत अस्त होईल आणि ९ ऑगस्टला उदित होईल. या गोचरचा सर्वाधिक लाभ वृषभ, कर्क यांसह काही राशींना होऊ शकतो. करिअर व कौटुंबिक जीवनात सुखद अनुभव दिसेल.

**गुरू गोचर २०२६**

**वृषभ :** या राशीच्या लोकांसाठी गुरू गोचर तृतीय भावात होईल. त्यामुळे वृषभ राशीचे लोक गुरूच्या प्रभावाने चांगला आर्थिक लाभ मिळवतील. मात्र, तुमचा खर्चही अधिक राहील. असे असताना देखील तुमची कमाई चांगली राहील. तुम्ही विविध शुभ कार्यांसाठी देखील पैसे खर्च करू शकता. भावंडांच्या आरोग्याची याकाळात काळजी घ्यावी लागेल. कौटुंबिक वादविवादाचा सामना करावा लागू शकतो.

**कर्क :** गुरूचे गोचर तुमच्या लग्नभावात राहील. त्याचप्रमाणे तुमच्या राशीतच हंस राजयोगही निर्माण होत आहे. त्यामुळे तुम्हाला मानसन्मान नोकरीत पद प्रतिष्ठा मिळण्याची शक्यता आहे. याकाळात लांबच्या प्रवासाचाही योग बनतोय. कामकाजात थोडीशी गडबडही होऊ शकते मात्र संघर्ष करावा लागेल त्याचे उत्तम परिणाम मिळतील तसेच चांगला आर्थिक फायदा आणि कामांमध्ये यश देखील मिळेल.

**कन्या :** या राशीच्या लोकांसाठी गुरूचे गोचर अकराव्या भावात राहील. त्यामुळे कन्या राशीच्या लोकांना चांगला लाभ होईल. पैसा मिळण्यासोबतच वाहन वगैरे खरेदीसाठीही खर्च होऊ शकतो. भाग्याची साथ मिळाल्याने नोकरी व्यवसायात प्रगती होण्याच्या शक्यता आहेत. तसेच, कामात सहज यश मिळू शकते. या दरम्यान एखादी आवडती प्रिय व्यक्ती भेटू शकते. नोकरी बदलायची इच्छा ज्यांना आहे त्यांचे प्रयत्न यशस्वी होतील.

**मकर :** या राशीच्या लोकांसाठी गुरूचे गोचर सप्तम भावात राहील. त्यामुळे अडचणींमधूनही कामांमध्ये सहज यश मिळू शकते. सर्व कामे सहज पूर्ण होतील आणि भाग्याची साथ मिळेल. तुम्ही या काळात प्रवासाचा विचार करू शकता. प्रवासांमुळे चांगला आर्थिक लाभ सुद्धा होईल. आरोग्य उत्तम राहील.



















(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)